## प्रकरण तिसरे

# शिरोळ तालुका आणि त्याची वैशिष्ठये

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण ३ रे

# शिरोळ तालुका आणि त्याची वैशिष्टे

### प्रस्तावना

प्रस्तावना आणि दोन प्रकरणामध्ये आपण भारतातील महिला संबंधी सामाजिक आणि राजकीय दर्जाचा आढावा घेतलेला आहे. शासनाचे महिलांचा दर्जा सुधारण्याविषयी झालेले प्रयत्न ही आपण पाहिले. भारताच्या आठव्या नियोजनापासून महिलांच्या सामर्थ्याविषयी दृष्टीकोण स्विकारल्याचे दिसते. सामाजिक दर्जा बदलण्यासाठी तसेच राजकिय सहभाग वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले असताना ही उद्दिष्टे समाधान कारकरित्या साध्य झालेले नसल्यामुळे सामाजिक, राजकिय, दर्जा बदलवयाचा असेल तर आर्थिक दर्जा हा महत्वाचा ठरतो. म्हणूनच शासनाकडून अनेक आर्थिक धोरणे राबविण्यात आली. त्याच दृष्टिकोनातून बचतगट ही महिलांच्या संदर्भात केवळ आर्थिक दर्जा प्राप्त करुन देत नसून बचत गटांच्या मार्फत या महिलांमध्ये निर्णय निर्धारण क्षमता वाढविण्यास वातावरण प्राप्त होते. हे ही अपेक्षित आहे. त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून स्त्री सामर्थ्य किती प्रमाणात वाढलेले आहे याचा अभ्यास आपण करित आहोत. यासाठी शिरोळ तालुक्याची निवड करण्यात आली आहे. याचे कारण शिरोळ तालुका हा सुद्न भाग असून देखील तेथील महिलांचा सामाजिक आणि राजकीय दर्जा अजूनही पारंपारिक वातावरणात अडकून असलेला दिसतो. म्हणून आपल्याला शिरोळ तालुक्याच्या संदर्भात थोडक्यात वैशिष्ट्ये जाणून घेणे गरजेचे आहे.

संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शिरोळ तालुका हा वैशिष्टपूर्ण मानला जातो. येथील असणारी सामाजिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती आणि आर्थिक परिस्थिती ही सर्वच बाबतीत सधन मानली जाते. येथील असणाऱ्या पाण्याखालील जमिनीमुळे सर्वच लोकांचा आर्थिक विकास पुरेशा प्रमाणात झाला आहे. शिक्षणामुळे या भागातील अनेक लोकांची सामाजिक परिस्थिती दिवसेंदिवस सुधारु लागली आहे. या बदलत्या परिस्थितीत महिलांचा ही तितकाच सहभाग महत्वाचा आहे. महिला शेतमजुरीच्या माध्यमातून तसेच इतर छोट्या मोठ्या उद्योगधंद्याच्या माध्यमातून या भागाच्या विकासासाठी अप्रत्यक्षरीत्या प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात या सामाजिक, आर्थिक, सदनतेमुळे राजकीय घडामोडी देखील खूप जलदरित्या घडून आलेल्या आहेत. त्या परिणामी संपूर्ण जिल्ह्यावरती छाप पडतील अशी व्यक्तीमत्वे निर्माण झाली. या नवनिर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्वामुळे विविध उद्योगधंद्यांची उभारणी होउ लागली या तालुक्यात असे नवनवीन उद्योगधंदे निर्माण झाल्यामुळे या तालुक्यातील जनतेचे जनजीवन अधिका अधिक समृध्द होवू लागले. या विकासासाठी येथील वैशिष्ठपूर्ण अशी भौगोलिक परिस्थिती सुध्दा महत्वाची भूमिका बजावत आहे.

## १. भौगोलिक रचना:

पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर जिल्हा भौगोलिक सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे अग्रगन्य ठरला आहे. छत्रपती शाहूंच्या कार्यामुळे या जिल्हयाचे नाव आणि लौकीक सर्वदूरपर्यंत पसरलेला आहे. कोल्हापूर जिल्हा उत्तर-दक्षिण शाहूवाडी ते चंदगड पर्यंत सह्याद्रीच्या उत्तुंग कड्यावरती पसरलेला आहे. तर गगनबावडा ते पूर्वेकडे शिरोळ पर्यंत या जिल्ह्याचा विस्तार आहे. अशा जिल्ह्यात पूर्वेकडील महाराष्ट्र-कर्नाटक सिमेवरील

कमी पावसाच्या मुरमाड आणि गाळाच्या जमिनीचा तालुका म्हणजे शिरोळ होय. या तालुक्यात एकूण ५२ खेडी आहेत. "तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ५०७८३ हेक्टर इतके आहे."[१] "त्याच प्रमाणे १६°३८° आणि १७° उत्तर अक्षांश तसेच ७३°८०° व ७४° पूर्व रेखांशाच्या मध्ये शिरोळ तालुका विस्तारलेला आहे."[२] "या तालुक्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ३३५.० ते ५४२.९ मीटर एवढी आहे."[३] तालुक्यातील जी नापीक जमीन आहे ती जमीन समुद्रसपाटी पासून सर्वात उंच आहे. तालुक्यात वार्षिक पर्जन्यमान अपुरे आहे. "१९८४ च्या आकडेवारीनुसार २५ पावसाळी दिवस आहेत. व सरासरी ३३१ मिली मीटर इतका पाऊस पडतो."[४] जून ते ऑक्टोबर या महिन्यात मुख्यत: पावसाळा असतो. तर मान्सून पूर्व पाऊस मात्र अधून मधून वादळ व विजांच्या कडकडाटात पडतो. तालुक्यातील नदीकाठची जमीन सामान्यत:हा उताराची व सुपीक आहे. या तालुक्याचा विस्तार पूर्वेकडे कृष्णानदी दक्षिणेकडे कर्नाटकचा चिक्कोडी तालुका पश्चिमेकडे हातकणंगले तालुका तर उत्तरेला सांगली जिल्ह्यातून येणारी वारणा नदी अशा पध्दतीने झालेला आहे. प्रामुख्याने या तालुक्यात वारणा, कृष्णा, पंचगंगाा व दूधगंगा या नद्यांचा किनारा येतो. नदीकाठची सूपीक गाळाची जमीन तर घोसरवाड मधील कोरडवाहू जमीन याच तालुक्यात आहे. पावसाचे प्रमाण कमी असेल तरी कृष्णानदीवर राजापूर येथे बांधलेल्या बंधाऱ्यामुळे सतत पाणी थांबते. तसेच विविध पाणी पुरवठा संस्था, वैयक्तिक, सामुहिक पाईप लाईन्स वैयक्तिक खोदलेल्या विहिरी आणि कॅनॉल सारख्या सोईमुळे शेतीसाठी, पिण्यासाठी व कारखाण्यासाठी पाण्याची मुबलक सोय झालेली असल्याने या तालुक्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसलेली आहे. कृष्णा आणि पंचगंगेचा संगम कुरुंदवाड, नरसिंहवाडी येथे झालेला असल्याने तर दानवाड जवळ दूधगंगा, कृष्णा यांचा

संगम झाल्याने वर्षातून एखादा दुसरा पुर हा येतोच त्यामुळे पाण्याचा तुटवडा कधीच भासत नाही. भौगोलिक दृष्ट्या विविधतेने नटलेला हा तालुका आपणास पहावयास मिळतो. दळणवळणाच्या बाबतीत कोल्हापूर, मिरज, सांगली हा रेल्वेमार्ग, शिवाय गावांच्या बाबतीत जयसिंगपूर, शिरोळ, कुरुंदवाड, दत्तवाड अशी गावे आपआपल्या वैशिष्ठांनी प्रसिध्द आहेत.

## २. शिरोळ तालुक्यातल अधिकतम खेड्याभोवती नदीचा परिसर:

सध्या बऱ्याच खेड्यामध्ये शेतजमीन असुनही पाण्याच्या अभावाने शेती केली जात नाही. ही पाण्याची समस्या महाराष्ट्रातील बऱ्याच भागामध्ये भेडसावते. जमीन कितीही चांगली असली तरी तेथे पाण्याचा साठा नसेल तर कोणतेच उत्पन्न चांगल्या प्रकारे घेता येत नाही. त्यामुळे सोलापूर, पंढरपूर, जत या भागात हीच मोठी समस्या आहे. मात्र शिरोळ तालुका या गोष्टीचा अपवाद आहे.

येथील असणाऱ्या ग्रामीण भागालगत नदीचा परिसर आहे. तसेच ज्या खेड्याजवळून नदी गेलेली नाही. तेथे शेतकऱ्यांनी अथवा कारखाणदारांनी पाईप लाईन्स करुन त्यांना पाण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे या भागात पाण्याचा तुटवडा कधीच जाणवत नाही. पंचगंगा, कृष्णा या नद्या तर खेड्यांना वरदानच ठरलेल्या आहेत. या नद्यामुळेच येथे शेती चांगलया प्रकारे केली जाते व मोठ्या प्रमाणात वेगवेगळी पिके घेतली जातात.तसेच या नद्यामुळे थोड्याफार प्रमाणात मासेमारी हा व्यवसाय चालतो यातुनच काही लोकांचा उदरनिर्वाह होतो.

## ३. शेती हा प्रमुख व्यवसाय :

कोणत्याही भागचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास व्हावयाचा असेल तर भूमी ह्या घटकाला अधिक महत्व असते. यामध्ये शेती जंगलसंपत्ती व पशूसंवर्धन यांचाही समावेश होतो. शिरोळ तालुक्याच्या स्वाभाविक रचनेमध्ये शेतीला प्राधान्य आहे. तालुक्यातील जमीन प्रामुख्याने काळ्या रंगाची आहे. तर नदीकाठची जमीन ही लाल रंगाची व गाळाची आहे. शेतीसाठी जमीन ही लाल रंगाची व गाळाची आहे. शेतीसाठी ही जमीन चांगल्या प्रतीची आहे. तालुक्याची स्वाभाविक रचना आणि हवामान यांचा विचार करता शेती महत्वाची मानली जाते.

या भागात शेतीमध्ये जास्ती जास्त लोक गुंतलेले आहेत तसेच येथे शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या मजुरांची संख्याही जास्त आहे. यामध्ये पुरुष व स्त्रिया मजूरीसाठी शेतीमध्ये जातात. तसेच पुरुषापेक्षा स्त्रियांना येथे दुय्यम स्थान दिलेले असल्यामुळे मिळणारी मजुरी ही तुलनात्मक दृष्टया स्त्रियांना कमी दिली जाते. यामध्ये शेतीत खत टाकणे, भांगलण करणे, ऊसाची लागण करणे या कामासाठी स्त्रियांना सांगितले जाते. त्यामुळे या भागात स्त्री मजुरांची संख्या पुरुषापेक्षा जास्त आहे.

प्रामुख्याने शिरोळ तालुका हा सधन तालुका असल्यामुळे येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती केली जाते. पूर्वी मात्र शेतीमध्ये कोळपणी, नांगरणीसाठी बैलजोडीचा वापर केला जात असे. सध्या मात्र ट्रॅक्टर सारख्या आधुनिक साधनांचा वापर केला जातो. तसेच मळणीसाठी नवनवीन साधने यांचा वापर होतो. तर शेतीमध्ये नवनवीन बियाणे खते, औषधे फवारणीसाठी आधुनिक तंत्राचा वापर केला जातो. शेतकऱ्यांना विविध तंत्राची माहिती व्हावी

म्हणून यात्रेमध्ये सुध्दा शेती प्रदर्शने भरविली जातात. शेती भरपूर असल्याने येथे दुभत्या जनावरांची संख्याही जास्त आहे. यामध्ये गाई, म्हैशी जास्त प्रमाणात आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून दुभत्या जनावरांची पैदास मोठ्या प्रमाणात केली जाते.

## ४. उच्चांकी उस उत्पादन:

पूर्वी शिरोळ तालुक्यामध्ये निरनिराळ्या पिकांचे उत्पादन घेतले जात होते. यामध्ये भात, गहू, ज्वारी, ऊस, भुईमूग, तंबाखू, मका या सारखी उत्पादने मोठ्या प्रमाणात घेतली जात होती. "१९९८-९९ च्या आकडेवारीनुसार शिरोळ तालुक्यामध्ये १७३२७ हेक्टर क्षेत्रामध्ये ऊसाचे उत्पादन घेतले गेले."[५] येथे असणाऱ्या दत्त सहकारी साखर कारखाण्यामुळे या ऊस उत्पादनाला अधिक चालना मिळाली आहे. यामध्ये आणखी हातभार म्हणून गुरुदत्त साखर कारखाना नुकताच सुरु झालेला आहे. तालुक्यात ऊसाच्या चांगल्या उत्पादनासाठी आधुनिक बि-बियांनाचा वापर केला जातो. जमीन व हवामान ही ऊसक्षेत्रासाठी योग्य आहे. त्यामुळे ऊस उत्पादन चांगल्याप्रकारे होते व येथील शेतकरी ऊसासाठी लागणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऊसाचे उत्पादने उच्चांकी घेत असलेला आढळतो. त्याचप्रमाणे ऊस पिकांमध्ये आंतरपिक म्हणून गहू, भूईमुग, शेंगा, हरभरा यांचेही उत्पादन घेतले जाते. सध्या शिरोळ तालुक्यातील मुख्य पिक म्हणून ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. उच्चांकी ऊस उत्पादनासाठी स्त्री मजुर वर्गाचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. या भागातील स्त्री अल्प मजुरीत काम करते. तसेच जास्तीत जास्त वेळ शेतीसाठी देते. म्हणून उच्चांकी उत्पादनासाठी स्त्रियांची ही तितकाच वाटा आहे.

UNIVERSITY

## ५. शिरोळ तालुक्यातील साखर कारखाने व औद्योगिक विकास:

शिरोळ तालुक्यात 'दत्त सहकारी साखर कारखाना' व टाकळीवाडी येथे असणारा 'गुरुदत्त साखर कारखाना' हे शिरोळ तालुक्यातील दोन साखर कारखाने आहेत. या साखर कारखान्यामुळे शिरोळ तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये चांगल्या पैकी प्रगती झालेली आहे. ''दत्त सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता ही २००३ च्या आकडेवारीनुसार ६५०० मेट्रीक टन इतकी आहे. प्रत्यक्ष गाळप हे १०,६८,००० मेट्रीक टन इतकी आहे व साखरेचे उत्पादन हे १,३३,२६६ मेट्रीक टन इतके आहे.''[६] कारखाण्याला लागणारा कच्चा माल म्हणजे ऊस लवकरात लवकर आणण्यासाठी वाहतुकीची सोय ही चांगल्या प्रकारे करण्यात आलेली आहे. रस्ते सुस्थितीत असल्यामुळे दळणवळणांचे कार्य चांगल्या प्रकारचे आहे.

साखर कारखान्याबरोबरच शिरोळ तालुक्यात औद्योगिक विकास ही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. यामध्ये कुरुंदवाड जयसिंगपूर, शिरोळ या भागात हा विकास चांगल्या प्रकारे झालेला आहे. कुरुंदवाड सारख्या गावात हातमागाचा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालतो. शिरोळ, जयसिंगपूर हद्दीत एम.आय.डी.सी चा विस्तार चांगल्या प्रकारे झालेला आहे. त्यामुळे या ठिकाणी आसपासच्या खेड्यातील लोकांना व्यवसायाच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत. कुलकर्णी पॉवर टुल्स ही जयसिंगपूरातील सर्वात जुनी व मोठी कंपनी आहे. तर भारतात सर्वत्र विस्तारलेली 'श्रीम' ही कंपनी अतिशय नावाजलेली आहे. तसेच घोडावत उद्योग समुहाची निरनिराळी उत्पादने कोल्हापूरातच नव्हे तर कोल्हापूरच्या बाहेर सर्वत्र प्रसिध्द आहेत.

या वेगवेगळ्या छोटया उद्योगधंद्यामुळे या तालुक्यातील आसपासच्या तरुण वर्गाला रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचप्रमाणे महिलांना ही या ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहेत. या रोजगारावरच महिलांनी लघू व्यवसाय ही चालु केलेले आहेत. यामध्ये खानावळ, पानपट्टी, हॉटेल्स यांचा समावेश आहे. या भागातील औद्योगिक वातावरणामुळे या व्यवसायांना चालना मिळालेली आहे.

## ६. सामाजीक परिस्थिती –

शिरोळ तालुक्यातील भौगोलीक परिस्थितीमुळे आणि सुपीक जमिनीमुळे येथील समाज सुध्दा संपन्न झालेला आहे. ''१९९१च्या जनगणनेनुसार शिरोळ तालुक्याची लोकसंख्या ३,५९१३६इतकी आहे . यामध्ये १,८४९६७इतके पुरूष व १,७४१६९इतकी स्त्रियांची संख्या आहे.''[७] यामध्ये हिंदू, मुस्लिम, जैन, व बौध्द अशा विविध समाजाचे लोक राहतात तसेच नांदणी खिद्रापूर, नृसिंहवाडी, घोसरवाड या ठिकाणी असलेली प्रसिध्द देवालये तर जयसिंगपूर येथे असलेले बौध्द विहार ही सामाजीक एकतेची साक्ष देतात . येथे प्रामुख्याने मराठी भाषेचा बोलण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत असला तरी त्याच्यावर कन्नड भाषेच्या उच्चाराचा प्रभाव असलेला दिसून येतो. मुस्लिम समाजामध्ये बोलली जाणारी हिंदी भाषा मिश्र स्वरूपाची असल्याने हिंदी,मराठी, कन्नड, यांचे संमिश्र स्वरूप भाषेमध्ये पहावयास मिळते . याच बरोबर कवी मुक्तेश्वर या सारख्या थोर मराठी महाकवीचे समाधी स्थळ तेरवाड येथे आहे. खीद्रापूरचे कोप्पेश्वर मंदीर हे वास्तुशिल्पाचा सुंदर नमुना आहे. कुरूंदवाडच्या कृष्णा नदीवर बांधलेला घाट हा संताजी घोरपडे यांच्या समाधीमुळे आणि उत्कृष्ट वास्तुशिल्पामुळे अतिशय नावाजलेला आहे. १९७२पूर्वी या तालुक्याचा विकास चांगल्या प्रकारे झाला नाही पण

कुरूंदवाड नृसिंहवाडी दरम्यान पंचगंगा नदीवरील बांधलेल्या पुलामुळे या तालुक्याचा चेहराच बदलून गेला.

शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने संपूर्ण तालुका सुशिक्षीत मानला गेलेला नसला तरी याला कारणीभुत मात्र येथे असणारा समाजवर्ग आहे. याचे कारण असे की स्त्रियांना नेहमी दिले गेलेले दुय्यमस्थान हेच होउ शकेल. परंतु सध्या हे कार्य मंदगतीने तर चालू आहे. येथील समाजावर धर्माचा पगडा अनिष्ठ रूढी, परंपरा शिवाय देवदासीची प्रथा, बुवाबाजी, भूतबाधा कर्नी इ. अंधश्रध्देचे रूप ग्रामीण भागात आज ही आहे. या तालुक्यात मोठ्या प्रमाणात यात्रा, सन, उत्सव साजरे केले जातात पारंपारीक कलेच्या दृष्टीने या तालुक्यात गोंधळी, भुत्या, कोरवी, बहुरूपी पांजराज, गर्भा अशा वेगवेगळ्या प्रकारची कला विविध प्रसंगी पहावयास मिळते.

स्त्रियांचा सहभाग शेती व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, कुटीरउद्योग,दुकानदारी इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आहे. पण आजपर्यंत स्त्रियांना संघटीत करून किंवा संघटीत होऊन सबलीकरणाच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केल्याचे जाणवत नाही. आजही अंधश्रध्दा आणि पारंपारिक विचारांच्या पगड्याखाली स्त्रिया दबलेल्या, वावरलेल्या आणि व्दिधा अवस्थेत असल्याचे जाणवते. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये सुशिक्षित स्त्रिया सुध्दा वेगवेगळ्या अंधश्रध्देच्या विरोधात उभे राहण्यास तयार नसल्याचे जाणवते. सामान्यपणे आहे त्याच परिस्थितीमध्ये समाधान मानण्याची प्रवृत्ती स्त्रीयांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. सामाजिक परिस्थितीमध्ये या तालुक्यातील स्त्रियांमध्ये संघटीत शक्ती निर्माण होण्याची गरज असल्याचे दिसून येते.

## ७. राजकीय परिस्थीती

समाजामध्ये राजकीय परिस्थिती एक साधन असायला हवे. परंतु दुर्देवाने राजकारण हेच ध्येय बनल्याचे जाणवते. कायद्याचे पालन करताना ग्रामपंचायत, नगरपालिका सहकारी संस्था. सरकारी नोकरी इ. मध्ये मिळणाऱ्या आरक्षणाचा फायदा घेतल्याचे दिसुन येत नाही. पण सध्या मात्र स्त्रियांमध्ये राजकीय जागृती होऊ लागली आहे. आरक्षणाचा फायदा स्त्रिया घेऊ लागल्या आहेत आणि त्यांचा राजकीय सहभाग वाढू लागला आहे. यामध्ये शिरोळ तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये एकूण १८ महिला 'सरपंच' पदावर असल्याचे पंचायत समितीतील आकडेवारीवरून समजते. तर १६० महिला ग्रामपंचायतीमध्ये सदस्य असल्याचे समजते. तर १६० महिला ग्रामपंचायतीमध्ये सदस्य असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून आढळते. पण निवडुन आलेल्या स्त्रीया सुध्दा पुरूषांच्या वैचारिक दबावाखाली काम करताना आढळतात. राजकीय पदे भोगत असताना पदाधिकारी म्हणून निवडुन आलेल्या स्त्रीया स्वतंत्रपणे निर्णय घेत नसल्याचे ग्रामीण भागात दिसते. या राजकीय परिस्थितीमध्ये सुजाण, सुशिक्षीत किंवा प्रगल्भरित्या स्त्रीया वळल्याचे दिसत नाहीत. अन्यथा अशा स्त्रियांनी पदाधिकारी होण्यामध्ये रस घेतल्यास ह्या तालुक्याचे चित्र उपभोगत नसल्याचे दिसते. यामध्ये एकीकडे कुटूंबाची जबाबदारी व घरकाम, शेतकामात असलेला सहभाग यामुळे स्त्रियांना एकत्रित होण्यामध्ये अडथळा येतो. अजुनही स्त्रियांना स्वतंत्रपणे विचार करण्यास मुभा दिली जात नाही. यामुळेच या राजकीय परिस्थितीमध्ये स्त्रिया सहभागी होताना दिसत नाहीत आणि जो निर्णय घेतला जातो तो पूर्णक्षमतेने घेतला जात नाही.

## ८. आर्थिक स्थिती:

शिरोळ तालुक्यात कारखानदारीसाठी लागणारा कच्चा माल दळणवळणाची साधने पाण्याची सोय आणि कामगारांची उपलब्धता यामुळे जयसिंगपूरमध्ये औद्योगिक वसाहत शिवाय तालुक्यातील दोन साखर कारखाने उत्तम प्रकारे चालू आहेत. तसेच शेतकामासाठी मिळणारे मजुर कामामध्ये फारसे कुशल नसल्यामुळे ते कमी मजुरीमध्ये शेतकऱ्यांना कामासाठी मिळतात. एकीकडे सधन शेतकरी तर दुसरीकडे अशिक्षीत गरीब शेतमजूर, कारखानदारीसाठी विजापूर, बीड, कर्नाटकचे काही मजूर येथे येतात यामुळे कमी मजुरीमध्ये मजुरांचा परिवार आणि गरजा भागविणे अशक्य होत आहे. पुरुषांपेक्षा स्त्री मजुरांची अवस्था दयनीय आहे. आर्थिक दृष्ट्या शिरोळ तालुक्यातील स्त्री मजूरवर्ग अतिशय दयनीय अवस्थेत राहिलेला आहे. त्यामुळे पारिवारीक वैयक्तिक वैद्यकिय गरजा पूर्ण न होऊ शकल्याने स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणात अंधश्रध्देकडे वळलेला आहे. यामुळेच या तालुक्यातील स्त्रिया संघटीत होऊ शकल्या नाहीत. याचा जबरदस्त फटका शिरोळ तालुक्यातील स्त्रियांना सहज करावा लागत आहे. आरोग्याचे प्रश्न-व्यसनाधिनता, शारिरीक दुर्बलता, शिवाय मानसिक व्दिधा स्थितीमध्ये येथील स्त्री अडकलेली आहे. या स्थितीला या ठिकाणची आर्थिक व्यवस्था कारणीभूत आहे. भविष्यकालीन गरजांची विचार करण्याची क्षमता, अशिक्षितपणा, पुरुषांपुढे दबलेली स्थिती, आर्थिक कमकुवत स्थिती, धार्मिकतेचा पगडा या सर्वामुळे या तालुक्यातील स्त्री सबल होऊ शकली नाही. २१ व्या शतकात सुध्दा स्त्रियांचा ही अवस्था पाहिल्यानंतर साहजिकच काही समाजसेवी संस्था, महिला मंडळे, शासकीय योजना, त्याचबरोबर सहकारी संस्था या

महिलांच्या सबलीकरणाकडे वळल्या आहेत. आजच्या समाजामध्ये विकासाचा वेग आणि दिशा पूर्णपणाने आर्थिक बाबींवर आधारित आहेत.

## ९. जयसिंगपूर नगरपरिषद :

''संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी १९१६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्व भागातून सांगलीच्या व्यापार पेठेत जाणाऱ्या शेतमालाला कोल्हापूर जिल्ह्यातच बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने जयसिंगपूरची निर्मिती केली. शाहू महाराजांनी आपले वडील जयसिंग महाराज घाटगे यांच्या स्मरणार्थ जयसिंगपूरची स्थापना केली. दक्षिणोत्तर दोन मुख्य रस्ते व त्याला भिडणारे पूर्व पश्चिम रस्ते या पध्दतीने शहराची आखीव रेखीव रचना, ग्रीन आयर्न पॅटर्न या आदर्श व सौंदर्यपूर्ण नगर रचना पध्दतीने शहराची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला जयसिंगपूरचा भाग 'शिरोळ खुर्द' म्हणून ओळखला जात होता. रेल्वे स्थानकाचे नाव ही शिरोळ खूर्द असेच होते. लोकांनी येथे येऊन रहावे व व्यापारांनी व्यापार वाढवावा म्हणून ७० बाय १२० चा प्लॉट अवघ्या १०० रुपयात घेवून शाहू महाराजांनी या शहराची मुहुर्तमेढ रोवली.''[८] स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीमुळे हरितक्रांती झाली. उपसा जलसिंचन योजनेमूळे या भागातील जिराईत जमीन मोठ्या प्रमाणात ओलिताखाली आली.

शाहू महाराजांनी बाजारपेठेच्या दृष्टीने जयसिंगपूरची स्थापना केली यामुळे साहजिकच स्त्री वर्गाला ही याचा फायदा झालेला आहे व महिलांनी या भागात छोटे व्यवसाय ही सुरु केले. तसेच ओलिताखालील जमिनीत ही वाढ झाली. यामुळे कांही महिला शेतमजुरीकडे वळल्या तर काही शेती करु लागल्या त्याच बरोबर महिलांनी शेती पुरक कुटीर उद्योग हाती घेतले

यामध्ये कुक्कुटपालन, शेळी पालन या माध्यमातून स्त्रीया आर्थिक देवाण-घेवाण करु लागल्या.

## १०. खिद्रापुर येथील कोपेश्वर व ऐतिहासिक जैन मंदीर:

"कोल्हापूर जिल्ह्यातील संपन्न असलेल्या शिरोळ तालुक्यातील पूर्व-दक्षिणेस असलेले शेवटचे गांव म्हणजे खिद्रापूर. हे गांव प्राचीन कोपेश्वर मंदीर व भगवान आदिनाथ दिगंबर जैन मंदिरामुळे प्रसिध्द आहे. कोपेश्वर मंदिरास तर महाराष्ट्राचा 'खजुराहो' संबांधले जाते. त्याच्या प्राचीन शिल्पकलेमुळे याच सारखी शिल्पकृती असलेल्या जैन समाजाचे प्राचीन श्री १००८ भगवान आदिनाथ दिगंबर जैन मंदीर मात्र प्रसिध्दीपासून थोडे अलिप्त राहीले."[९] "हे मंदिर इ.स. ११०५ ते ११४० पर्यंतच्या शिलाहार राजवटीतील असल्याचे सांगितले जाते."[१०] "खिद्रापूरचे प्राचीन नाव 'कोप्पद' असे असल्याचे इ.स. १०७७ च्या येवूर (जि. विजापूर) येथील शिलालेखावरुन आढळून येते."[११] याच नावावरुन येथील शिव मंदीरास कोपेश्वर हे नाव पडले. या मंदिराच्या पश्चिम बाजूस आदिनाथ तीर्थकरांचे जैन मंदीर आहे. ही शिल्पाकृती प्राचीन शिल्पाकृतीच्या अप्रतिम नमुना आहे. या मंदिराचे प्रवेशव्दार आतील बाजूस भव्य सभामंडप असून त्याची लांबी साडे आठ मीटर व रुंदी साडेसात मीटर आहे. "हे सभा मंडप चार मोठ्या दगडी खांबावर उभारले असून या खांबावर बारीक नक्षीकाम केले आहे. मंदीराचे गर्भगृह तीन मीटर लांब-रुंद आहे. मंदिराच्या गर्भगृहात १००८ भगवान आदिनाथ तिर्थकरांची साडे सहा ते सात फुटाची सुंदर मूर्ती आहे. ही मूर्ती बेसॉल्ट खडकाच्या काळ्या ग्रॅनाइट पासून बनविली आहे. या मूर्तीच्या वेगवेगळ्या भावमुद्रा दिसतात हे या मूर्तीचे वैशिष्ठ आहे. ही मूर्ती अतिशय प्रमाणबध्द असून त्याचा बांधा अप्रतिम आहे. त्याची भावमुद्रा

धीरगंभीर, शांत व सोज्वळ अशी आहे. शिल्पकाराने आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून ही मूर्ती घडविल्याचे यावरुन दिसून येते. अशा प्रकारची मूर्ती चिक्कोडी येथील जैन मंदीरात असल्याचे सांगितले जाते. या मंदिराचा बाह्य भाग शिल्पकलेने नटलेला असून, त्यामध्ये जैनधर्मातील व्यंतरदेवता, शालनदेवता यक्ष किन्नर गंर्धव, क्षेत्रपाल अप्सरा, अष्ट दिलपाल नागकन्या इ. शिल्पकृती आढळून येतात. मंदीराचे भव्य असे शिखर असून त्याची उंची ३० फूटापर्यंत आहे. शिखर हे पंचमहाली द्रवीडी, शिल्पकला पध्दतीचे आहे. प्राचीनकाळी दक्षिण भारतात दक्षिणापथ संबोधले जात असे. त्यामध्ये तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ व महाराष्ट्राचा दक्षिण भाग येत होता. यामध्ये सांगली, कोल्हापूर, सातारा भाग व कर्नाटकातील बेळगांव व विजापूरचा भाग येतो. इ.स. चौथ्या शतकात राष्ट्रकुट राजाच्या अंमलाखाली हा प्रदेश होता.''[१२] या राजाचा मांडलिक म्हणून शिलाहार राजे काम करीत होता. मात्र नंतरच्या काळात द. महाराष्ट्रात कोल्हापूरच्या शिलाहार राजानी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्याचे आढळून येते. या कोल्हापूरच्या शिलाहाराच्या वंशात गण्डरादित्य हा पराक्रमी राजा होवून गेला. तो प्रशासनात कर्तबगार होता. तसेच त्याला साहित्य व कलेची तिच्या प्रोत्साहानामुळे या काळात अनेक जैन मंदिर बांधकाम आली. त्यापैकी खिद्रापुरचे हे जैन मंदिर होय.

## ११. नृसिंहवाडी :

औदुंबर, गाणगापूर आदी श्री दत्त क्षेत्रास नरसोबावाडीचे स्थान अनन्य साधारण आहे. श्री. नृसिंहसरस्वतीच्या एक तपाच्या वास्तव्याने पावन झालेले हे क्षेत्र असून पूर्वी हे नृसिंहवाडीका या नावाने ओळखले जायचे. नंतर अपभ्रंशाने नृसिहवाडी म्हणजे महाराजांच्या

नावाने ओळखले जावू लागले. या क्षेत्राला श्री दत्ताची राजधानी सुखाची असे संबोधले जाते. "नृसिंहवाडी क्षेत्र सुमारे ६०० वर्षापासूनचे पावन व प्राचीन मानले जाते. शके १३४४ ते १३५६ या काळात श्री नृसिंह सरस्वती स्वत: एक थोर सतपुरुष होते. यामुळे फुलाभोवती जसे भ्रमर आकर्षित होतात त्याप्रमाणे अनेक योगी संत पुरुषांचे वास्तव्य आहे."[१३]

प्राचीन दत्त मंदिर विजापूराच्या तत्कालीन बादशहाने बांधले आहे. महाराजांच्या कृपादर्शनाने या बादशहाच्या कन्येचे अंधत्व नाहीसे झाले त्यांनी आपल्या अखत्यारीतील औरवाड, गौरवाड, ही दोन गावे इनाम दिली. तसेच येथील महाराजांचे मंदीर ही बांधले आजही श्रींच्या महापुजेनंतर त्यांच्या पादुकांवर गलफासारखे वस्त्र घातले जाते व त्यावर पानपुजा बांधली जाते. मंदीरासमोरील घाट संत एकनाथांनी बांधल्याचा उल्लेख आहे.

श्री. रामकृष्ण ज्या प्रमाणे जोडअवतार आहेत त्याप्रमाणे श्रीपाद वल्लभ व नृसिंह सरस्वती असे दत्तात्रयांचे जोड अवतार आहेत. "श्री. नृसिंह सरस्वतीचे जन्मस्थान अकोल्याजवळ कारंजा आहे. पुढे औदुंबर भिलवडी येथे निघून ते नृसिंहवाडी येथे आले. तेथे त्यांनी १२ वर्षे वास्तव्य केले. श्री च्या मंदिरासमोर कृष्णा नदी पलीकडे श्री आमरेश्वर (औरवाड) नावाचे गाव आहे. ६४ योगीनींचा तिथे सहवास असून त्या श्रींच्या पुजनासाठी मध्यानी येते असत."[१४]

भगवान दत्तात्रय श्री नृसिंह सरस्वतीच्या स्वरुपात सदैव या क्षेत्रात वास्तव्य करत असून ते दत्त भक्तांनी दिन दु:खितांची दु:खे दूर करतात असे अनेकांना प्रत्यय आलेला आहे. यामुळे येथे दर्शनासाठी अजुनही दुरदूरहून लोक येतात. वेदविद्या पारंगत घराण्याची परंपरा श्री च्या कृपेने पूर्वीपासून असून अत्तापर्यंत ठरलेल्या वेळी न चुकता होत असतात.

शिरोळ तालुक्याच्या वैशिष्टांचा अभ्यास करीत असताना तेथील भौगोलिक रचना लक्षात घेतल्यास शिरोळ तालुक्यातील अधिकतम खेड्यांभोवती नदीचा परिसर दिसतो. त्याच बरोबर अनेक सांस्कृतिक वैशिष्ट्यामध्ये नृसिंहवाडी, खिद्रापूर या तिर्थस्थानांचे दोन प्रकारचे प्रभाव झाल्याने दिसून येतात. नदीपरिसरामुळे झालेली सुबत्ता आणि तिर्थस्थानामुळे झालेली आर्थिक वाढ या शिवाय नदी परिसरामुळे शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याचा दिसतो. त्यामुळे ऊस उत्पादन उच्चांकी या तालुक्याने गाठलेले आहे. शिरोळ तालुक्यातील साखर कारखाने व औद्योगिक विकास ही उल्लेखनीय आहे. एकूणच शिरोळ तालुक्याची आर्थिक स्थिती पाहता वरील सर्व उल्लेख केलेल्या गोष्टीमुळे या तालुक्याची आर्थिक स्थिती उत्तम असल्याची दिसून येते. तरीसुध्दा महाराष्ट्रातील तालुक्याप्रमाणे जरी आर्थिक स्थिती भौगोलिक कारणामुळे उत्तम असली तरी शिरोळ तालुक्यातील महिलांचा समाजिक दर्जा बदललेला दिसत नाही. तशीच परिस्थिती राजकीय क्षेत्रात दिसून येते. ७३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून ३३% महिला आरक्षण असल्यामुळे तसेच सरपंच पदासाठी आरक्षण असल्यामुळे स्त्रियांचा सहभाग सांख्यिकी दृष्टिकोनातून वाढला असला तरी खऱ्या अर्थाने त्यांचा राजकीय सहभाग होत नसल्याचे दिसून येते. तालुक्यातील १८ महिला सरपंचाची माहिती घेतली असता त्यातील १६ महिला सरपंच कुटुंबातील पुरुषांच्या सांगण्यावरुनच कामकाज पाहत असल्याचे दिसून आले. फक्त दोन महिलाच स्वतंत्ररीत्या सरपंच पदाचा स्वमर्जीने सकारात्मक पध्दतीने वापर केल्याचा आढळून येते. याचे कारण महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांप्रमाणेच तीर्थक्षेत्र आणि धार्मिक विचारप्रणाली याचा प्रभाव कुटुंबियावर झाल्याचे दिसून येते. धर्माच्या माध्यमातून पुरुष प्रधान संस्कृती टिकून राहिलेली आहे. शेती, दुग्धउत्पादन, कुटीरउद्योग, मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा

सहभाग असला तरी आर्थिक सुत्रे त्या त्या कुटुंबातील पुरुषांच्या हाती असल्यामुळे पुरुषांचे वर्चस्व टिकून राहिलेले आहे. यामध्ये सुध्दा आपल्याला या अभ्यासातून असे दिसून आले की याचे कारण शिरोळ तालुक्यातील असलेला धर्माचा, अंधश्रध्देचा, रुढी, परंपरांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे स्त्री पुरुषांच्या सत्ता संबंधामध्ये फरक असल्याचा दिसून येतो.

अनेक स्त्रिवाद्यांनी मांडल्याप्रमाणे पुरुष सत्ता समाज किंवा पुरुष प्रधान समाज म्हणजेच पुरुषांचेच वर्चस्व हे वर्चस्व कुटुंबापसून ते सार्वजनिक जीवनापर्यंत असते. असे वर्चस्व उत्तर वैदीक कालखंडापासून असल्याचे दिसते. पुरुष प्रधान समाजामध्ये पुरुषांचे महिलावरील नियंत्रण विविध माध्यमातून जाणीव पूर्वक आणले गेल्याचे दिसून आलेले आहे. मग ते माध्यम मालमत्ता, धर्म-धर्मसंस्था शिक्षण-शिक्षणसंस्था, संस्कृती आणि खुद्द स्त्रीवर पुरुषांचे शारिरीक लैंगिक नियंत्रणाचा ही वापर केला जातो. या नियंत्रणाव्दारे पुरुषाचे स्त्रीवर वर्चस्व प्रस्थापित होत असते. अशी स्थिती आपल्याला भारतीय जीवनामध्ये दिसून आलेली आहे. शिरोळ तालुका यास अपवाद नाही.

## संदर्भ सुची:


| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा २००२-२००३ | |
| २. | सौ. योजना वसंतराव जुगळे | ''शिरोळ तालुक्यातील स्त्री मजुरांचे वेतन आणि संबंधीत समस्या'', शिवाजी विद्यापीठातील अप्रकाशित शोध प्रबंध, पान नंबर ६०. |
| ३. | कित्ता | पान नंबर ६० |
| ४. | संपादक, किं.का. चौधरी | महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा |
| ५. | जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा २००२-२००३ | |
| ६. | कित्ता | |
| ७. | कित्ता | |
| ८. | अजित मांगुरकर | शिरोळ तालुका विशेशांक, दैनिक तरुण भारत, ११ सप्टेंबर २००३ |
| ९. | डॉ. विलास सांगवे | शिरोळ तालुका विशेशांक, दैनिक तरुण भारत, ११ सप्टेंबर २००३ |
| १०. | कित्ता | |
| ११. | कित्ता | |
| १२. | कित्ता | |
| १३. | रविंद्र केसरकर | शिरोळ तालुका विशेशांक, दैनिक तरुण भारत, ११ सप्टेंबर २००३ |
| १४. | कित्ता | |